Web-www.zpraigad.maharashtra.gov.in
E-mail- ndtrzp@gmail.com
दुरध्वनी क्रमांक - 02141-222232
फॅक्स क्रमांक - 02141-222076 / 222070

जा.क्र/राजिप/ग्रापं/नेसंविप्रा/२५०/२०१६
नेरळ संकुल विकास प्राधिकरण कक्ष
ग्रामपंचायत विभाग
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
दिनांक:- ०२/०६/२०१६

RAIGAD ZILLA PARISHAD RZP ALIBAG

प्रति,
**मोहम्मद मुखत्यार अब्दुल रौफ काझी**
**मु.नेरळ, ता. कर्जत**
**जिल्हा रायगड.**

**विषय:-** मौजे नेरळ ता. कर्जत येथील सर्वे नंबर ४३९ भूखंड क्रमांक ६ एकुण क्षेत्रफळ ४५२.०० चौ.मी. या जमिन मिळकतीवर निवासी कारणासाठी बांधकामास परवानगी मिळणेबाबत

**संदर्भ:-**
१. आपले कडील प्रस्ताव दिनांक **०३.१०.२०१५**
२. सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांचे कार्यालयाकडील पत्र **क्रमांक - राअ/बां.प./मौजे नेरळ/ता.कर्जत/ स.नं. ४३९/भू. क्र. ६/१८१ दिनांक २२/०१/२०१६**
३. मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांजकडील बिनशेती आदेश क्र. मशा /बिनशेती/अ-१/प्र.क्र. १७६/२००१ दिनांक २८/०१/२००१.
४. तहसिलदार, कर्जत यांचेकडील पत्र क्रमांक मशा/बांधकाम परवानगी/के.नं. १५९/२०१५ दिनांक १६.०१.२०१६.
५. या कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी यांनी प्रस्तावाधिन भूखंडाची स्थळ पाहणी करुन दिलेला तांत्रिक छाननी अहवाल **दिनांक १०/०२/२०१६.**
६. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २५० दिनांक २६/०४/२०१३.
७. स्थायी समिती सभा ठराव (प्रस्तावास शिफारस) क्रमांक **१११० दिनांक ०८/०३/२०१६.**
८. कार्यालयीन मंजूर टिप्पणी **दिनांक ०२/०६/२०१६.**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये आपण विषयांकित मिळकतीवर बांधकाम परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. ज्या अर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (१९६६ चा ३७वा) चे कलम २ चा उपखंड (१५) (सी)(१)सहखंड १९ चे अनुसार मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे त्यांना शासन, नगर विकास व आरोग्य विभाग, अधिसूचना क्रमांक टीपीएस-३१७७-१९८९-युडी-६, दिनांक १०/१२/१९७९ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन रायगड जिल्हा परिषदेस रायगड जिल्हयातील नेरळ डॉर्मिटरी टाऊनशिपच्या क्षेत्राकरिता उपरोक्त अधिनियमाखाली नियोजन प्राधिकरणाच्या शक्ती वापरण्याची परवानगी दिली आहे.

ज्या अर्थी रायगड जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०७/२०१० ठराव क्रमांक ५५८ व दिनांक १३/१२/२०१० ठराव क्रमांक ६२९ अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांची नगर रचना अधिकारी म्हणून नेमणूक करणेंत आली आहे.

ज्या अर्थी उपरोक्त संदर्भिय २ अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांनी नियोजित बांधकामाच्या नकाशाची छाननी करुन व योजनेच्या विकास नियंत्रण नियमावली अनुसार विषयांकित जागेत शर्तीना अधिन राहून बांधकाम परवानगी देणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

ज्या अर्थी उपरोक्त संदर्भिय ३ अन्वये **मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग** यांनी प्रस्तावित भूखंडाचे रेखांकनास बिनशेती मंजूरी दिलेली आहे. तसेच संदर्भिय ४ अन्वये प्रस्तावित भूखंडाचे बिनशेती आदेश व्यापगत नसल्याबाबत व मालकी हक्काबाबत वाद-विवाद नसल्याबाबत तहसिलदार, कर्जत यांनी या कार्यालयाकडे अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये अर्जदार यांनी मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या भूखंडावर येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध आहे. सदर जमिनीवर वन खात्याच्या तरतुदी लागू नाही अथवा २२ अ खालील चौकशी प्रलंबित नाही. सदर जमिनीवर जाणारा रस्ता वनखात्याच्या जमिनीमधून जात नाही. सदर जमिनीसाठी आदिवासी खातेदारांचा संबंध नाही. सदर जमिनीमधून गटार अथवा पाण्याची पाईपलाईन जात नाही तसेच जमिनीवरुन अतिउच्च दाबाची विद्युतवाहिनी जात नाही असे नमूद केलेले आहे.

ज्या अर्थी उपरोक्त संदर्भिय ५ अन्वये या कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी यांनी प्रस्तावाधिन भूखंडाची स्थळ पाहणी करुन तांत्रिक छाननी अहवाल सादर केलेला आहे.

ज्या अर्थी उपरोक्त संदर्भिय ६ अन्वये नेरळ संकुल विकास प्राधिकरणातील बांधकाम परवानगीचे प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेकडून छाननी व पडताळणी होऊन प्राप्त झाल्यानंतर सदरची प्रकरणे ग्रामपंचायत विभागाने जिल्हा परिषद स्तरावर करावयाची कार्यवाही करुन प्रत्येक प्रकरणाची छाननी व पडताळणी करुन सर्व बाबींची पुर्तता झालेली असल्यास असे प्रत्येक प्रकरण मंजूरीसाठी स्थायी समिती समोर ठेवणे. स्थायी समितीने ठरावाद्वारे मान्यता दिल्यानंतर या प्रकरणी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.) हे संबंधित विभाग प्रमुख असल्यामुळे त्यांनी निर्देशित केलेमुळे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांची बांधकाम परवानगीचे प्रारुप आदेशासह मान्यता घेऊन बांधकाम परवानगी आदेश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी त्यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेची कार्यवाही करणेबाबत स्थायी समिती सभा दिनांक २६.०४.२०१३ ठराव क्रमांक २५० अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

त्याअर्थी उपरोक्त संदर्भिय ७ अन्वये स्थायी समिती, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी बांधकाम परवानगी देणेबाबत मंजूरी दिलेली आहे.

प्रस्तुत प्रस्तावाचे विकास शुल्कापोटी बांधकाम क्षेत्रावर **८७१५०/-आणि** वृक्ष लागवडीसाठी रक्कम रूपये **४५२०/-** आकारणेत आली आहे तसेच सहाय्यक संचालक यांचे अभिप्रायानुसार सदर बांधकामाबाबत **०.२० पेड चटई क्षेत्र प्रिमियम रूपये ३,१४,५९२/-** एकुण रक्कम रूपये ४०६२६२/- दिनांक १८/५/२०१६ रोजी RTGS क्रमांक UTIBR52016051800089719 अन्वये जिल्हा परिषद विकास निधी खात्यामध्ये जमा केले आहेत.

आणि ज्या अर्थी उपरोक्त संदर्भिय ८ अन्वये कार्यालयीन टिप्पणी प्रारुप आदेशासह मंजूर करणेत आलेली आहे.

**त्या अर्थी सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांच्या अटी व शर्तीना अधिन राहून त्यांनी दिलेल्या ना-हरकत / शिफारस पत्रानुसार रायगड जिल्हा परिषद, अलिबाग आपल्या उपरोक्त संदर्भिय क्रमांक १ अन्वये विषयांकित मिळकतीवरील सादर प्रस्तावास खालील नमूद केलेल्या क्रमांक १ ते ३१ अटी व शर्ती बंधनकारकठेवून नगर रचना विभागाने सोबतच्या मंजूर नकाशाप्रमाणे निवासी व वाणिज्य कारणाकरिता इमारतीचे बांधकाम करणेस परवानगी देण्यांत येते.**

**बांधकाम परवानगी देणेत येत असलेल्या प्रस्तावाचा छाननी तक्ता खालील प्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of Applicant | **मोहम्मद मुखत्यार अब्दुल रौफ काझी** |
| 2. | Name of Owner | **मोहम्मद मुखत्यार अब्दुल रौफ काझी** |
| 3. | Name of Builder | **मोहम्मद मुखत्यार अब्दुल रौफ काझी** |
| 4. | Total Plot Area (as per 7/12 ) | **452.00 $m^2$** |
| 5. | Total Plot Area (as per T.I.L.R ) | **452.00 $m^2$** |
| 6. | Area as per demarcation | **452.00 $m^2$** |
| 7. | Area as per possession | **452.00 $m^2$** |
| 8. | Area under D.P. Road | **NA** |
| 9. | Net plot area for F.S.I. calculation | **452.00 $m^2$** |
| 10. | F.S.I. permissible(With premium) | **1.2** |
| 11. | F.S.I. being utilized now | **1.197** |
| 12. | Built-up area permissible | **542.40 $m^2$** |
| 13. | Total Built-up area proposed | **541.30 $m^2$** |

इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर इमारतीसाठी आवश्यक ती पाणीपट्टी आणि घरपट्टी रक्कम नियमानुसार ग्रामपंचायत **नेरळ** ता. कर्जत यांचेकडे जमा करणे आपणांस बंधनकारक राहिल.

इमारत बांधकाम करित असतांना इमारत बांधकामाचे साहित्य सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारात पडणार नाही याची दक्षता घेणेंत यावी. अशा प्रकारे इमारत बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळून आल्यास आपणांस कारवाई करणेबाबत संबंधित विभागास कळविणेंत येईल किंवा इमारत बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कारवाई सुध्दा करणेंत येईल याबाबतची नोंद घेणेंत यावी.

बांधकाम सुरु असतांना जागेवरील रिकामे गाळे / सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमीन मालक / भूखंडधारक / विकासक / गाळेधारक यांची राहिल. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणून भूखंडधारकाने भूखंडाभोवती नियमाप्रमाणे भिंतीचे कुंपन बांधून त्याठिकाणी अनुचित प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करतांना आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणेंत येईल याची नोंद घ्यावी.

विषयांकित भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा भरणीकरुन उंच करुन घ्यावी.

इमारतीचे सांडपाणी, मैला आणि पावसाळयाचे पाणी यांचा निचरा योग्यप्रकारे होऊन भूखंडामध्ये पाणी साचणार नाही याप्रमाणे भूखंड समपातळीत तयार करणेंत यावा.

इमारतीचे बांधकाम करणारे मजूराकरिता तात्पुरत्या निवासासाठी शेड उभारणेंत यावी. तसेच आरोग्याच्या दृष्टीकोनातुन सदरहू शेडलगत स्वच्छतागृह बांधणेंत यावीत. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदरच्या शेड भूखंडधारक / विकासक यांनी स्वखर्चाने काढून टाकणेंत यावीत.

इमारतीचे बांधकाम हे मंजूर नकाशा प्रमाणेच करणेंत यावे. मंजूर बांधकाम नकाशामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडून सुधारित बांधकाम नकाशे मंजूरी घेणे आवश्यक राहिल. मंजूर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदींनुसार कारवाईस पात्र राहिल याची नोंद घ्यावी.

ZILLA PARISHAD ZP ALIBAG

इमारत बांधकाम सुरु करणेपूर्वी जमीन मालकाचे नांव, बांधकामाचाबाबतचा तपशील, बांधकाम परवानगीचा क्रमांक व तारीख, वास्तुविशारदाचे नांव, स्थापत्य विशारदाचे नांव व ठेकेदाराचे नांव दुरध्वनी क्रमांकासह दर्शविणारा फलक बांधकाम क्षेत्रात लावण्यांत यावा. या बाबतची माहिती रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडे सादर करणेंत यावी.

**प्रस्तुत इमारत बांधकाम परवानगीचा कालावधी हे आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून एक वर्षाचा राहिल.** तसेच सदरच्या इमारतीचे बांधकाम एक वर्षाच्या आंत पूर्ण झाले नाही तर त्यानंतर पुढील वर्षासाठी अर्जदार यांनी योग्यत्या कारणासहीत नियोजन प्राधिकरणाकडे विनंती अर्ज करुन परवानगीचे नुतनिकरण मुदतसंपणे आधि करणे आवश्यक राहिल. अशा प्रकारचे नुतनिकरण फक्त ३ वर्षे करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण केले नसेल तर नवीन परवानगी घ्यावी लागेल. नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तीत्वात असलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुषंगाने छाननी करणेत येईल व ती बाब अर्जदार / जमिन मालक यांचेवर बंधनकारक राहिल.

**<u>सदरहू इमारत बांधकामासाठीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:-</u>**

१. शासनाने अ, ब व क वर्ग नगर परिषदेसाठी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक ६.८ नुसार अर्जदाराने / विकासकाने प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी रस्ते, Storm Water Drains, Sewer Line, Water Supply Line and development of open spaces इत्यादी व इतर आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करणे अनिवार्य आहे.

२. शासनाने अ, ब व क वर्ग नगर परिषदेसाठी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक १३.३.२ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

on sanction of the development permission, the common plot shall deemed to have vested in the society / Association of the residents / Occupants. The recreational open spaces shall not be sold to any other person & it shall not be put to any other user accept for the common use of residents / occupants.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खुल्या जागेचा (recreational open space) वापर हा residents / occupants च्या सामाईक वापराकरिता करणेंत येणे बंधनकारक राहिल.

४. नियोजित इमारतीचा वापर निवसी व वाणिज्य या कारणासाठी करण्यांत यावा व इमारत बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे बांधण्यांत यावे.

५. मंजूर नकाशा प्रमाणे इमारतीच्या जोत्यापर्यंतचे काम पूर्ण झालेवर या जोत्याची तपासणी उप अभियंता बांध) रायगड जिल्हा परिषद उपविभाग कर्जत यांच्याशी परस्पर संपर्क साधून त्यांच्याकडुन ज्योत्याचे (Plinth Certifcate) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून त्यानंतर जोत्यावरील बांधकामास या कार्यालयामार्फत परवानगी देणेंत येईल..

६. प्रस्तुत प्रकल्पात प्रस्तावित LIG/EWS आणि MIG सदनिकांचे एकत्रिकरण अनुज्ञेय असणार नाही.

७. इमारतीच्या बांधकामामध्ये Rain Water Harvesting ची आवश्यक ती तरतुद करणे बंधनकारक राहिल.

८. नियोजित इमारत बांधकामापासून बांधकाम क्षेत्रात पुढील, मागील व दोन्ही बाजूची अंतरे मंजूर नकाशाप्रमाणे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत, व जागा ही कायमची खुली ठेवावी.

९. विषयांकित भूखंडावरील इमारतीचे बांधकाम हे नकाशावर नमूद केल्याप्रमाणे **तळ +३ मजल्यांचे व उंची ११.४० मीटर** यापेक्षा जास्त असू नये.

१०. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची सोय, सांडपाण्याची सोय, मैला आणि घनकचरा निर्मूलनाची व्यवस्था भूखंड धारकाने / विकासकाने करणे बंधनकारक राहिल.

११. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत (Source) पासून सेप्टीक टँकचे अंतर हे किमान १२.०० मीटर असणे आवश्यक आहे.

१२. प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे खोलीच्या क्षेत्राच्या १/६ पेक्षा कमी असू नये.

१३. नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहिवाटीचा हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालकाने घेणे आवश्यक आहे.

१४. विषयांकित भूखंडावर बांधकाम करतांना **IS CODE-13920-1993** भूकंपरोधक **RCC** डिझाईननुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकरुन करुन घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे भूखंडधारक / विकासक यांचेवर बंधनकारक राहिल.

१५. इमारतीचे बांधकाम हे राष्ट्रीय इमारत बांधकाम सांकेतांकाप्रमाणे (National Building Code) करणेंत यावे. तसेच भूखंडासभोवतालच्या रहिवाशांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी भूखंडधारक / विकासक यांनी घेणे बंधनकारक आहे.

१६. इमारत बांधकामाचे वेळी कोणत्याही प्रकारचा अपघात घडून दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही भूखंडधारक / विकासक यांचेवर राहिल. **तसेच कामगार आयुक्तांकडून बांधकाम करणारे मजूर यांना लाभ देणेसाठी प्रयत्न करावे.**

१७. इमारत बांधकाम करतांना कोणत्याही प्रकारची अस्तित्वातील गटारे, रस्ते व पाणी पुरवठा योजना इत्यादींचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई ही भूखंडधारक / विकासक यांनी करावयाची आहे.

१८. नियोजित इमारतीचे जागेवर जर जून्या इमारतीचे बांधकाम तोडावयाचे असल्यास अशी जूनी इमारत तोडल्यानंतर ग्रामपंचायतीने दिलेल्या निर्देशानुसार निघालेल्या साहित्याची विल्हेवाट भूखंडधारक / विकासक यांनी करावयाची आहे.

१९. शासन परिपत्रक उद्योग दर्जा व कामगार विकास याजकडील दिनांक २६ ऑक्टोंबर २००९ अन्वये बांधकामाच्या एकुण मुल्यानुसार (जमिनीचे मूल्य वगळून ) एक टक्का (१%) कामगार कल्याण उपकर रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने नियमानुसार जमा करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२०. नियोजित इमारत बांधकामाचा प्रगती अहवाल **वेळोवेळी** नियमीतपणे रायगड जिल्हा परिषदेला सादर करणे बंधनकारक असून अहवाल सादर न केल्यास भोगवटा प्रमाणपत्र देणेंत येणार नाही.

२१. उपरोक्त संदर्भिय ४ अन्वये तहसिलदार, कर्जत यांनी अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे बिनशेती आदेशातील भंग केलेल्या अटींपोटी दंडाची रक्कम तहसिलदार, कर्जत यांचेकडे भरणा करणे बंधनकारक राहिल अन्यथा जोत्यावरील बांधकामाला परवानगी देणेंत येणार नाही.

२२. सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांनी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहिल. सदरची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

२३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कोणतेही नियम, अटी व शर्ती यांचे उल्लंघन केल्यास सदरची इमारत बांधकामाची परवानगी रद्द करणेंत येईल.

२४. नियोजत इमारत बांधकामासाठी सरकारी प्राधिकरण जसे मुंबई महानगर प्रादेशिक विकास संस्था सारख्या इतर प्राधिकरणांचा यांचा ना-हरकत दाखला आवश्यक असल्यास तो घेणे नियमानुसार बंधनकारक राहिल.

२५. प्रस्तावित प्रकल्पाच्या समोरील अस्तित्वात / नियोजित रस्ता विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यापूर्वी विकसित करुन ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावा.

२६. प्रस्तावित प्रकल्पातील सदनिका / गाळयांचा वापर भूखंडधारक / विकासक यांना प्राधिकरणाचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याशिवाय सदनिकेंचा / गाळयांचा करता येणार नाही. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२७. विषयांकित भूखंडाबाबत कोणताही कायदेविषयक वाद-विवाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा निपटारा करण्याची सर्वस्वी जबाबदारी भूखंडधारक / विकासक यांची राहिल.

२८. भूखंडधारक / विकासकयांनी सादर केलेली माहिती चूकीची अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास ही परवानगी रद्द समजणेत यावी.

२९. नैसर्गिक मार्गाचे झरे बंदिस्त केलेले आहेत. तरी नवीन नैसर्गिक पाण्याचे झरे वाहुन जाण्यासाठी (Water Way Calcalation) प्रमाणे नाले तयार करणेत यावेत. नैसर्गिक पाण्याचे झरे बंदिस्त केल्यामुळे काही प्रश्न उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी विकासकाची राहिल.

३०. पाणी पुरवठा व जलनिःसरणाबाबत आणि घनकचरा-याबाबत सदरचा प्रकल्प हा स्वयंपूर्ण असला पाहिजे.

३१. सहाय्यक संचालक यांचे छाननी व पडताळणी अहवालातील अटी भूखंडधारक/विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

RAIGAD ZILLA PARISHAD RZP ALIBAG

**मा. मु.का.अ. यांचे मान्य टिप्पणीनुसार** **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**प्रतः माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.
३. मा. सदस्य सचिव, स्थायी समिती तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

**प्रतः माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**

१. सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग.
२. कार्यकारी अभियंता (बांध. / ग्रापापु), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.
३. तहसिलदार, कर्जत जि. रायगड.
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत जि. रायगड.
५. उपअभियंता (बांध./लपा), रायगड जिल्हा परिषद उपविभाग, कर्जत जि. रायगड.
६. सरपंच / ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, **नेरळ** ता. कर्जत जि. रायगड.